**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९ फोर्ट, मुंबई-४०० ०३२. ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

जा.क्र.मअ/ /२०२५
दिनांक: २०/०१/२०२५

प्रति,
संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

विषय – महाअधिवक्ता कार्यालयातील सन २००२ सालची झेरॉक्स मशिन ची विक्री करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की या कार्यालयातील सन २००२ सालची झेरॉक्स मशिन मॉडेल Sharp Copier AR- ५०१५, Serial No . २०५०७४६४ ची विक्री करण्यासाठी निविदा मागविण्या बाबतची या पत्रासोबत जोडलेली सूचना कृपया महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर दि. २२/०१/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात यावी, हि विनंती.

आपला विश्वासू,

( भू.मो.मेहेर )
अधिक्षक,
महाधिवक्ता यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**महाअधिवक्ता यांचे कार्यालय,**
पहिला मजला, खोली कमांक 5,
जोड इमारत, उच्च न्यायालय,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.- २२६२३७७९
ईमेल- advocategeneral.mah@gmail.com

जा.क्र.मअ/ /२०२५
दिनांक: २०/०१/२०२५

# जाहिर नोटीस

## लिलावाव्दारे जुन्या झेरॉक्स मशिनची विक्री

मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथील सन २००२ सालची झेरॉक्स मशिन मॉडेल SHARP COPIER AR-५०१५, Serial NO. २०५०७४६४ लिलावाव्दारे खालील अटी व शर्तीवर विक्री करावयाची आहे.

अटी व शर्ती-

१. झेरॉक्स मशिन विक्रीबाबतचा जाहिर लिलाव हा दि.०७/०२/२०२५ रोजी माननिय महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकार्यालय, पहिला मजला, खोली कमांक 5, जोड इमारत, उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई-४०० ०३२ येथे संध्याकाळी ५ वाजता होईल.

२. झेरॉक्स मशिन आहे त्या स्थितीत आहे त्या स्वरुपात विक्री करावयाची आहे. विक्री केल्यानंतर कसल्याही प्रकारचा दावा किंवा वाद एकुन घेतला जाणार नाही .

३. झेरॉक्स मशिनची पाहणी करण्यासाठी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत लिलावाच्या दिनांकापूर्वी पर्यंत कामकाजाच्या दिवाशी उपलब्ध राहील. या कार्यालयाचे अधिक्षक, पर्यवेक्षी ज्येष्ठ लिपिक. लिपिक-टंकलेखक हे सदरचे झेरॉक्स मशिन दाखवतील.

४. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या आधारकार्डची छायांकित प्रत अथवा इतर ओळखपत्रांची छायांकित प्रत या कार्यालयास सादर करावी लागेल.

५. एकदा विक्री केलेली झेरॉक्स मशिन ही कुठल्याही परिस्थितीत परत घेतली जाणार नाही.

६. झेरॉक्स मशिन निर्धारीत मुल्य ही कमीत कती रु.९,१०३/- ऐवढी आहे. लिलावादरम्यान रु.९,१०३/- पेक्षा सर्वात जास्त बोली बोलणाऱ्या व्यक्तीस सदरची झेरॉक्स मशिन विकली जाईल.

७. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींनी लिलावापुर्वी रोख अनामत रक्कम रु.१०००/- जमा करणे आवश्यक आहे.

८. लिलावाव्दारे झेरॉक्स मशिन विकत घेणाऱ्या व्यक्तीस लिलावाची संपूर्ण रक्कम रोखीने २४ तासाच्या आत या कार्यालयात जमा करावी लागेल.

९. झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींस झेरॉक्स मशिन ताब्यात दिल्यापासून तीन दिवसांच्या आत (सुट्टीयासहीत) मशीन स्व:खर्चाने या कार्यालयातून घेऊन जावी लागेल.

१०. झेरॉक्स मशिन जी व्यक्तीं खरेदी करेल त्याव्यतिरिक्त इतर व्यक्तींची अनामत रक्कम त्वरीत परत केली जाईल तसेच झेरॉक्स मशिन खरेदी करणाऱ्या व्यक्तींची अनामत रक्कम झेरॉक्स मशिन घेऊन जातांना परत केली जाईल. आठ दिवसाच्या आत झेरॉक्स मशिन घेऊन न गेल्यास झेरॉक्स मशिन खरेदीकरणाऱ्या व्यक्तींशी अनामत रक्कम जप्त केली जाऊ शकते.

११. लिलावादरम्यान बोली स्विकारणे अथवा नाकारणे तसेच कोणतेही कारण नमुद न करता अटी व शर्ती मध्ये बदल किंवा दुरुस्ती करणे इत्यादी सर्व अधिकार विक्री समिती राखुन ठेवत आहे.

१२. झेरॉक्स मशिन विक्री संर्दभातील या कार्यालयाचा निर्णय हा अंतिम व झेरॉक्स मशिन खरेदी करु इच्छिणाऱ्या व्यक्तीवर बंधनकारक राहील.

महाअधिवक्ता महाराष्ट्र राज्य, मुंबई